PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 5

# विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठतव या जगामाजी

**सौ. किशोरी भगवान ठाकुर**
संशोधिका पीएच्.डी (कला)
शिक्षणशास्त्र
मुंबई विद्यापीठ
**महाराष्ट्र भारत**

**डॉ. नरेंद्र पी. पाटील**
मार्गदर्शक
पीएच्.डी (कला) शिक्षणशास्त्र
मुंबई विद्यापीठ
**महाराष्ट्र भारत**

हे कृष्णशास्त्री चिपळुणकरांचे उद्‌गार पूर्णपणे सार्थ आहे. मानवाने समाज निर्माण केला. राज्यसंस्था निर्माण केली.संस्कृती निर्माण केली.धर्माची स्थापना केली.आपल्या नवनवोन्मेषशालीन प्रतिभेतून तत्वज्ञान,शास्त्र,कला,साहित्य यांना जन्म दिला.सर्व उन्नतीला पायाभूत असलेली भाषा निर्माण करून आपले सगळे अनुभव व सांस्कृतीक संचित शब्दांकित करून ते शिक्षणाच्या माध्यमातून पुढील पिढीस प्रदान करण्याची पद्धती रूढ केली म्हणुन प्राचिन काळापासून शिक्षण हा जीवनातील आवश्यक संस्कार होवून बसला आहे.बुद्धी,हृदय व आत्मा यांचा विकास म्हणजे शिक्षण होय.

शाळा ही समाजाची लहान प्रतिकृती आहे.शिक्षक कोवळया वयातील बालंकाच्या मनावर संस्काराचे सुयोग्य ठसे उमटविण्याचा प्रयत्न करून त्यांना भावी आदर्श नागरीक होण्याच्या दृष्टिने बालंकाना प्रेमाने,जिव्हाळयाने व सहानुभूतीने वागणूक देऊन त्यांच्यावर योग्य संस्कार करीत असतात.शिक्षक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता हातभार लावीत असतात.संपूर्ण शिक्षणव्यवस्था ही प्रामुख्याने शिक्षकावरच अवलंबून असते.शिक्षणाची उंची अथवा त्या शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा दर्जा हा त्या शाळेतील शिक्षकांवर त्यांच्या व्यवसायिक उंचीवर अवलंबुन असतो.त्यामूळे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा कणा म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. माध्यमिक शाळेतील

विद्यार्थ्यांचा कुमारगट हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.या वयोगटाला शिकवणारा शिक्षक हा त्या वयोगटाच्या मानसिक गरजा आणि सामाजिक गरजा ओळखून ज्ञान देणारा असणारा पाहिजे.

अध्यापनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी काही किमान सुविधा व शैक्षणिक साधने शाळेत असावीत असे कोठारी आयोगाने प्रतिपादन केले आहे.माध्यमिक शाळांतील सुविधा,यामध्ये शालेय परिसरातील सर्व घटकांचा समावेश होतो.त्यामध्ये शाळेचे ठिकाण, इमारत,वर्गखोल्या,शैक्षणिक साधने,साहित्य,प्रयोगशाळा,ग्रंथालय, फर्निचर,क्रीडांगण व इतर अभ्यासपूरक खोल्या,अध्ययन अध्यापनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी व अध्ययन अध्यापनाचे कार्य चांगल्या प्रकारे होण्यासाठी वातावरण निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व शालेय बाबींचा समावेश सुविधांमध्ये होतो.परंतू दूदैवाने हया सर्व सोईसुविधा सर्वच माध्यमिक शांळामध्ये आढळून येत नाही व त्यामूळेच शिक्षकांना अध्ययन.अध्यापन प्रभावी करण्यासाठी अनेक समस्यांना तोंड दयावे लागते.या शिवाय शिक्षक हा देखील माणूस आहे.समाजात वावरतांना त्यालाही अनेक शारीरिक,मानसिक,भावनिक समस्यांचा सामना करावा लागतो.जसे एखादया शाळेत विद्यार्थी समाजाच्या विविध स्तरांतुन येत असतात तसेच शिक्षकही समाजाच्या विविध स्तरांतुन येत असतात त्यामुळे त्यांना जाणवणाऱ्या समस्यांचे स्वरूपही वेगवेगळे असु शकते.

ज्ञानाच्या प्रचंड वाढीमूळे नव्या विदयाशाखा व नव्या अध्यापन पद्धती व नवे शैक्षणिक तंत्रविज्ञान उदयाला आले.पारंपारीक अध्यापन पद्धतीची जागा नव्या अधुनिक पद्धती उदा०क्रमन्वित अध्ययन पद्धती,सुक्ष्म अध्ययन,भाषा प्रयोगशाळा,स्वंय अध्ययन,गटचर्चा वापर अध्यापनात करावा लागत आहे. निरनिराळया दृकश्राव्य साधनांबरोबर प्राजेक्टर,डीएल अशा तंत्रवैज्ञानिक साधनांचा वापर करावा लागतो परंतू बऱ्याच शांळामध्ये अशा सोईसुविधांची कमतरता जाणवते. त्यातच बदलणारे अभ्यासक्रम,मूल्यमापण पद्धती या सर्वांचा प्रभाव शिक्षकांच्या अध्यापनावर होतो.

शिक्षकांच्या व्यवसायात असलेली प्रतिष्ठा,दर्जा, वेतनश्रेणी,सेवासंबंधी प्रचलित अटी,नियम, संस्थाप्रमुख संस्थेची कार्यपद्धती,शिक्षक सहकारी,विद्यार्थी या बाबचा सारासार विचार केला असता शिक्षक व्यवसाया संबंधी अनेक समस्या जाणवतात.त्याचा परिणाम त्यांच्या व्यवसाय समाधानावर होतो व पर्यायाने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर होतो.

शालेतील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास साधण्यासाठी शालेय परिसर आरोग्यप्रद असणे, शाळेतील शिक्षक,विद्यार्थी, कर्मचारी यातील संबंध चांगले असणे.शाळेत विविध उपक्रम चांगल्यारातीने चालु असणे.अध्ययन अध्यापन,शाळेचे व्यवस्थापण व प्रशासन लोकशाही प्रधान असणे या बाबींची आवश्यकता असते.शासन कागदोपत्री अनेक सोईसुविधा शाळेला मिळत असल्यातरी खरे पाहता १००% शासन नियमावर खऱ्या उतरणाऱ्या शाळांची संख्या बोटावर मोजण्याइतकी आहे.त्यातच इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या बेसुमार वाढीमुळे व शासनाच्या

दुर्लक्षामुळे मराठी माध्यमांच्या शाळांची हालत ‘बिकट’होत चालली आहे.आज समाजात भरमसाट ‘फी’ भरून इंग्रजी शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशावेळी मराठी माध्यमिक शाळांकडे,शाळेतील शिक्षकांच्या समस्यांचे निराकरण न झाल्यामुळे शिक्षक व्यवसायात असमाधानी होत आहेत.शिक्षकांचे अध्यापन निरस होते अशावेळी त्याचे मन व्यवसायात रमत नाही त्याला आनंद मिळत नाही.नोकरीची हमी राहीली नाही. शासनाच्या बदलत्या शैक्षणिक धोरणामुळे त्यांना नवनव्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.असा व्यवसाय असमाधानी शिक्षक विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास घडवुन आणू शकेल? किंवा शिक्षणांच्या ध्येयाप्रमाणे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवुन आणण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांना येणाऱ्या समस्यां त्यांचे व्यवसाय समाधान परिणाम करते का? शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा त्यांच्या व्यवसाय समाधनावर प्रभाव पडतो का? शिक्षकांच्या व्यवसायिक असमाधानाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर परिणाम होतो का? हे सर्व प्रश्न संशोधिकेच्या मनात निर्माण झाले व संशोधिकेने प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला.

## संबंधित साहित्य व संशोधनाचे परिशीलन

संशोधनासाठी निवडलेली समस्या,जनसंख्या व चल घटक याचाच अभ्यास पूर्ववर्ती अभ्यासकाने केल्याचे आढळुन आल्याने त्याची सप्रमाणता व विश्वासनीयता काय आहे,या संबंधित सारासार विचार करून त्या समस्येचा अभ्यास नव्याने केला आहे.या अभ्यासाच्या पुनरावृत्तीने वर्तमान ज्ञानात सुधारणा होण्यास मदत होईल.

१.**मोहपात्रा टी १९९१** यांनी ओरासातील कटक जिल्हयातील खाजगी/शासकीय माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समस्यांचा अभ्यास केला असुन सदर संशोधनात त्यांनी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.प्रश्नावली,रचनात्मक मुलाखती व निरीक्षण तंत्र या साधनांचा वापर केला. कटक मधील खाजगी/शासकीय शाळेतील ४०० शिक्षकांपैकी २०० पुरुष शिक्षक व २०० स्त्री शिक्षक यांची निवड केली.सदर संशोधनातून असे निष्कर्ष मिळाले की,समाजाच्या सर्व स्तरांतून शिक्षक आले परंतू जास्त मध्यमवर्गीय कुटूंबातुन आले.खाजगी शाळेतील शिक्षक सरकारी शाळेतील शिक्षकांपेक्षा जास्त शिकलेले आहेत.शासकीय व खाजगी शाळांमधील वर्गखोल्यातुन भरपुर विद्यार्थी व तुकडयाही भरपुर आहेत.शाळेच्या भौतिक सुविधा शासकीय शाळेत आढळतात खाजगी शाळांमध्ये आढळत नाहीत तसेच माध्यमिक पाठयपुस्तक,लेखक व धडयांची निवडीबाबत बहुतांश शिक्षक असमाधानी आहेत.

२ **सहदेव पुजारी २००९** यांनी सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व ,अध्यापन सक्षमता,परिणामकारकता व व्यवसाय समाधान यांचा सहसंबंधात्मक अभ्यास केला.सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीमधील शालेय सर्वेक्षण पद्धतीचा

वापर केला आहे.त्यात वाळवा तालुक्यातील माध्यमिक शाळेतील ५९३ न्यादर्श म्हणून निवड केलेली आहे.सदर संशोधनातुन असे निष्कर्ष मिळाले की माध्यमिक शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व समायोजन चांगले आहे.अध्यापन सक्षमता समाधानकारक आहे परंतू अध्यापन परिणामकारक नाही.शिक्षकांचे व्यवसाय समाधान चांगले असले तरी वयोमानानुसार व्यवसाय समाधान कमी हीत जाते.

३ **श्रीमती स्वाती बजरंग बायस १९९९** यांनी सोलापुर शहरातील माध्यमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास केला.सदर संशोधनासाठी शालेय सर्वेक्षण पद्धतीची निवड केली.न्यादर्श म्हणुन सोलापुर शहरातील ६७ मराठी माध्यमिक शाळेतील ३१५ शिक्षकांची निवड केलेली आहे. प्रश्नावली व पद्निश्चयन श्रेणीचा वापर करून माहिती संकलीत करण्यात आली.सदर संशोधनातुन असे निष्कर्ष मिळाले की,माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक स्त्री/पुरुष शिक्षक व्यवसाय समाधानी आहेत परंतू संस्थेची ध्येयधोरणे,वरिष्ठांकडून मिळणाऱ्या वागणुकी विषयी असमाधानी आहेत. अनुदानित व विनाअनुदानित शिक्षकांच्या व्यवसाय समाधानामध्ये फरक आहे.अनुदानित शाळेतील शिक्षक हे विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांपेक्षा जास्त व्यवसाय समाधानी आहेत.

४ **श्री.संजय गणेश मोरे २००७** यांनी माध्यमिक शिक्षकांचे व्यवसाय समाधान एक अभ्यास केला आहे.सदर संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. संशोधकाने धुळे जिल्हयातील एकुण २२८ माध्यमिक शिक्षकांचा अभ्यास केला.हे शिक्षक ग्रामीण,शहरी स्त्री/पुरूष होते. प्रो०प्रमोदकुमार,डॉ.डी.एन.मुथा यांनी प्रमाणीत केलेली शिक्षक व्यवसाय समाधान प्रश्नावलीचा वापर करून माहिती संकलीत केली.सदर संशोधनाचे असे निष्कर्ष मिळाले की,एकंदरीत शिक्षक आपल्या व्यवसायात समाधानी असले तरी सेवाशर्ती नियमाबद्दल,संस्थेच्या नियमाबद्दल ते असमाधानी आढळून येतात. शिक्षकांना मत व्यक्त करु दिले जात नाही.शाळाप्रमुख शिक्षकांच्या त्त्फायदयासाठी प्रयत्न करीत नाहीत.शिक्षकांच्या असमाधानाचा परिणाम शिक्षकांच्या अध्यापनावर होतो.

५ **कुलकर्णी ज्योती भास्कर २००९** यांनी औरंगाबाद जिल्हयातील माध्यमिक स्तरावरील समग्र गुणवत्ता व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास केला आहे.सदर संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.न्यादर्श म्हणुन औरंगाबाद जिल्हयातील ग्रामिण,निमशहरी,शहरी या तीन भागातील ५४ शाळा,१०८ माध्यमिक शिक्षक व ५४० वद्यार्थी तसेच १०८ पालंकाची माहिती संकलनासाठी निवड केली. प्रश्नावली व मुलाखत साधनांचा वापर करून माहिती संकलीत केली.सदर संशोधनातुन असे निष्कर्ष मिळाले की,सर्व माध्यमिक शाळांमध्ये पुरेशा भौतिक सुविधा उपलब्ध नाहीत.सर्वच माध्यमिक शाळांमध्ये ग्रंथालयीन कर्मचारी,प्रशासकीय वर्ग,लिपीक वर्ग व सेवक वर्ग ही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. शाळेतील शिक्षकांकडून प्रत्येक विषय उत्तमरीत्या शिकवला जात नाही

त्यामुळे विद्यार्थ्यांचा संबंधित विषय कच्चा राहतो ज्याचा विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर पर्यायाने शालेय गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो.

**६ केंद्रे विठ्ठल गंगाराम १९९४** यांनी मराठवाडयातील माध्यमिक शाळांतील सुविधा आणि त्यांचा शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेशी असलेल्या संबंध यांचा अभ्यास केला आहे.सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील शालेय सर्वेक्षण पद्धतीची वापर केला आहे.सदर संशोधनात शहरी,तालुका,ग्रामिण खाजगी शाळा व शहरी,तालुका,ग्रामिण जिल्हापरिषदेच्या शाळा अशा एकुण १०० माध्यमिक शाळांची निवड करून प्रश्नावली भरून घेतली.संस्थाचालक,मुख्याध्यापक व माध्यमिक शिक्षक यांच्या मुलाखती घेतल्या.सदर संशोधनातुन असे निष्कर्ष आले की,शालेय परिसराची मूल्यमापनानुसार श्रेणी लावली असता सर्व खाजगी शाळांचा शालेय परिसर हा जिल्हापरिषदेच्या माध्यमिक शाळांपेक्षा चांगला आहे.त्यांची शैक्षणिक प्रगती जिल्हापरिषदेच्या शाळांच्या मानाने चांगली आहे.संपूर्ण शहरी शाळा व संपूर्ण ग्रामिण शाळा यांच्यातील शैक्षणिक प्रगतीची तुलना केली असता शहरी शाळांची प्रगती चांगली आहे.शैक्षणिक गुणवत्ता ही शालेय सुविधांवर अवलंबुन आहे.

**संशोधन अभ्यासाची गरज**

संशोधिकेने संशोधनाचे सिंहावलोकन केले असता असे लक्षात आले की,माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समस्यां, शिक्षकांचे व्यक्तिमत्त्व,अध्यापनातील सक्षमता,परिणामकारकता या संदर्भात अभ्यास झाला आहे. शिक्षकाचे व्यवसाय समाधान व समाधानावर परिणाम करणारे घटक यांचा अभ्यास झाला आहे.माध्यमिक शाळेतील सुविधा आणि त्यांचा शाळेच्या गुणवत्तेशी संबंध आढळयाचे दिसुन आले.तसेच शिक्षकांचे व्यवसाय समाधान हे शालेय गुणवत्तेवर परिणाम करते असे आढळुन आले.

परंतु माध्यमिक शिक्षकांच्या समस्यां त्यांचे व्यवसाय समाधान व विद्यार्थी गुणवत्ता विकास यांच्या संबंधाचा अभ्यास झाल्याचे आढळून आले नाही म्हणुन संशोधिकेने सदर संशोधनात ठाणे जिल्हयातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यवसायिक समाधान व विद्यार्थी गुणवत्ता विकास यांच्याशी असलेल्या संबंधाचा अभ्यास या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले.संबंधित साहित्य व संशोधनाच्या परिशिलनामुळे संशोधिकेला माध्यमिक शाळांतील शिक्षकांना येणाऱ्या समस्या,समस्यांचा कारणे,व्यवसाय समाधान व समाधानावर परिणाम करणारे घटक तसेच विद्यार्थी गुणवत्ता विकासावर परिणाम करणारे घटक जाणून घेता आले.

**संशोधन समस्या**

ठाणे जिल्हयातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा त्यांच्या व्यवसायिक समाधान व विद्यार्थी गुणवत्ता विकास यांच्याशी असलेल्या संबंधाचा अभ्यास

**चलांच्या कार्यात्मक व्याख्या**

ठाणे जिल्हा :- महाराष्ट् राज्यातील ३६ जिल्हयापैकी कोकण विभागातील एक जिल्हा

माध्यमिक शाळा :- महाराष्ट राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पूणे यांचा अभ्यासक्रम असलेली इयत्ता ९ व इयत्ता १० वी चे अध्ययन करणारी शाळा

माध्यमिक शिक्षक :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पूणे यांचा अभ्यासक्रम असणाऱ्या इ०९ वी व इ० १० वी च्या वर्गाला अध्यापन करणारे शाळा शिक्षक

समस्या :- शिक्षकाला व्यवसाय करताना येणाऱ्या वैयक्तिक,व्यवस्थापकीय, शासकीय, भौतिक व अध्यापनात येणाऱ्या समस्या

व्यवसाय समाधान :- शिक्षक या नात्याने ज्या ठिकाणी काम करतो त्या कामाची स्थिती,दर्जा, कार्यातील अभिरूची,वेतन सुरक्षितता उच्च दर्जाच्या कामासाठी विकाससंधी या संदर्भात शिक्षकांची अपेक्षा पूर्ण होणे म्हणजे व्यवसाय समाधान होय.

विद्यार्थी गुणवत्ता विकास :- विद्यार्थ्याने शालेय परिक्षेमध्ये इ०९ वी व इ० १० वी इयत्तेत केलेली शैक्षणिक प्रगती.

## प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे

१.ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा एकत्रितरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

२.ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा वैयक्तिकरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

२.अ . ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या वैयक्तिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

आ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या व्यावसायिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

इ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या शासकिय समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

ई. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

उ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

ऊ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे

३.. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या समस्यां त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम यावर आधारीत पुनर्गमन समीकरण स्थापित करणे.

४.ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा एकत्रितरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

५.ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा वैयक्तिकरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

५.अ . ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या वैयक्तिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

आ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या व्यावसायिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

इ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या शासकिय समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

ई. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

उ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

ऊ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे

६. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्यां त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम यावर आधारीत पुनर्गमन समीकरण स्थापित करणे.

## संशोधनाच्या परिकल्पना

प्रस्तुत संशोधनावर आधारीत पुढील परिकल्पना तयार केल्या गेल्या आहेत

परिकल्पना १. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा एकत्रितरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

२.ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा वैयक्तिकरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

२.अ . ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या वैयक्तिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

आ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या व्यावसायिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

इ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या शासकिय समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

ई. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

उ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासशी लक्षणिय संबंध नाही.

ऊ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

३.ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा एकत्रितरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

४.ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा वैयक्तिकरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

४.अ . ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या वैयक्तिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

आ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या व्यावसायिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

इ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या शासकिय समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

ई. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

उ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या भौतिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

ऊ. ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या शैक्षणिक समस्यांचा विद्यार्थी गुणवत्ता विकासाशी लक्षणिय संबंध नाही.

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने ठाणे जिल्हयाचा विचार केला आहे. ठाणे जिल्हयातील अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड, शहापुर, कल्याण व उल्हासनगर या तालुक्यातील माध्यमिक शाळांतील शिक्षकांचा समावेश केला आहे. संशोधनात केवळ मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांमधील माध्यमिक स्तरावर विदयार्थ्यांचा समावेश केला आहे. पूर्व प्राथमिक, प्राथमिक शाळांचा विचार केलेला नाही. तसेच संशोधनात विदयार्थ्यांच्या बोधात्मक क्षमतेचा अभ्यास केला आहे. मराठी माध्यमिक शाळां व्यतिरिक्त इतर कोणत्याही शाळांचा समावेश संशोधनात केलेला नाही.

## संशोधनाची पध्दती

प्रस्तुत संशोधन संशोधिकेने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. ही संशोधन पद्धती वर्तमान काळाशी संबंधित असून अभ्यास विषयाच्या विविध क्षेत्रातील वर्तमान स्थिती निधीत करणे हे तिचे उद्दिष्ट आहे.त्यामूळे ठाणे जिल्हयातील माध्यामिक शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान व विद्यार्थी गुणवत्ता विकासा संदर्भात वर्तमान स्थितीतील माहिती संकलीत करण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला आहे.

संशोधिकेने सर्वेक्षण पद्धतीने विद्यालय सर्वेक्षण केले आहे.सर्वेक्षण या पद्धतीचा उद्देश विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या संदर्भात शिक्षकांना येणाऱ्या समस्या व त्यांचे व्यवसाय समाधान असल्याने यांच्या संबंधातील कार्यवाही अभ्यासा बाबतचे प्रश्न या मध्ये आहेत .म्हणून प्रस्तुत संशोधन ही पद्धती वापरताना प्रश्नावली तंत्राचा वापर केला आहे.इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी वर्गाला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी प्रश्नावली तयार करण्यात आली आहे.

## संशोधनाचा न्यादर्श

प्रस्तुत संशोधनात ठाणे जिल्हयातील शहरी भागातील अनुदानित व विना अनुदानित शाळेतील पुरुष आणि महिला शिक्षक तसेच ग्रामिन भागातील अनुदानित व विना अनुदानित शाळेतील पुरुष आणि महिला शिक्षक यांचा समावेश करण्यात आला आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासा संदर्भात शिक्षक शिकवत असलेल्या विषयाच्या वार्षिक निकालाची टक्केवारीचा समावेश करण्यात आला आहे.

कोष्टक क्रमांक :- १

| अ.क्र. | तालुका | एकुण शाळा | अनुदानित शाळा | विनाअनुदानित शाळा | शहरी | | | | | | | | ग्रामीण | | | | | | | | एकुण टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अनुदानित शाळा | | पुरुष शिक्षक | स्त्री शिक्षिका | विनाअनुदानित शाळा | | पुरुष शिक्षक | स्त्री शिक्षिका | अनुदानित शाळा | | पुरुष शिक्षक | स्त्री शिक्षिका | थ्वनाअनुदानित शाळा | | पुरुष शिक्षक | स्त्री शिक्षिका | पुरुष | स्त्री |
| | | | | | एकुण | १० / | | | एकुण | १० / | | | एकुण | १० / | | | एकुण | १० / | | | | |
| १ | अंबरनाथ | ४५ | २६ | १९ | १८ | ०२ | ३१ | ०६ | १३ | ०१ | ०० | ०२ | ०८ | ०१ | २७ | ११ | ०६ | ०१ | ०२ | ०२ | ६० | २१ |
| २ | भिवंडी | ५९ | ३५ | २४ | ०६ | ०१ | १६ | ०५ | ०५ | ०१ | ०४ | ०५ | २९ | ०३ | ३६ | १२ | १९ | ०२ | ०८ | ०९ | ६४ | ३१ |
| ३ | कल्याण | १२६ | ८० | ४६ | ६६ | ०३ | २२ | २० | २६ | ०३ | ०९ | ०५ | १४ | ०१ | १६ | ०४ | २० | ०२ | ०८ | ०५ | ५५ | ३४ |
| ४ | शहापूर | ६४ | ३७ | २७ | | | | | | | | | ३७ | ०४ | ७२ | ३८ | २७ | ०३ | १७ | ०६ | ८९ | ४४ |

सौ. किशोरी भगवान ठाकुर डॉ. नरेंद्र पी. पाटील 

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | मुरबाड | ४० | २५ | १५ | | | | | | | | | २५ | ०३ | ४३ | १४ | १५ | ०२ | ०८ | ०६ | ५१ | २० |
| ६ | ठाणे | १६० | ९० | ७० | ९० | ०९ | ६५ | ७२ | ७० | ०७ | २४ | ०७ | | | | | | | | | ८९ | ७९ |
| ७ | उल्हास नगर | २५ | १६ | ०९ | १६ | ०२ | २५ | १३ | ०९ | ०१ | ०३ | ०२ | | | | | | | | | २८ | १५ |
| **एकुण** | | **५१९** | **३०९** | **२१०** | **१९६** | **१७** | **१७९** | **११६** | **१२३** | **१३** | **४०** | **२१** | **११३** | **१२** | **१९४** | **७९** | **८७** | **१०** | **४३** | **२८** | **४५६** | **२४४** |

संशोधनात समाविष्ट शाळा व शिक्षक यांच्या नमुन्याचा आकार

कोष्टक क्रमांक :-१ अन्वये ठाणे जिल्हयात एकुन सात तालुके आहेत. अंबरनाथ,भिवंडी,कल्याण, शहापूर, मुरबाड, ठाणे व उल्हासनगर तालुक्यामध्ये मराठी माध्यमाच्या ५१९ शाळा आहेत.त्यात अनुदानित शाळा ३०९ तर विनाअनुदानित शाळा २१० आहेत.त्यापैकी शहरी भागात एकुन १९६ अनुदानित शाळेतील १७ शाळांमधील १७९ पुरुष शिक्षक व ११६ महिला शिक्षकांची निवड करण्यात आली.तसेच शहरी भागातील विनाअनुदानित एकुन१२३ शाळांपैकी १३ शाळेतील ४० पुरुष शिक्षक व २१ महिला शिक्षकांची निवड करण्यात आली. शाळा व शिक्षकांच्या नमुना आकाराचे जनसंख्योशी असलेले शेकडा प्रमाण येथे १० टक्के आहे.

अशाच प्रकारे ठाणे जिल्हयातील ग्रामिन भागात एकुन ११३ अनुदानित शाळेतील १२ शाळांमधील १९४ पुरुष शिक्षक व ७९ महिला शिक्षकांची निवड करण्यात आली.तसेच ग्रामिन भागातील विनाअनुदानित एकुन८७ शाळांपैकी १० शाळेतील ४३ पुरुष शिक्षक व २८ महिला शिक्षकांची निवड करण्यात आली. शाळा व शिक्षकांच्या नमुना आकाराचे जनसंख्योशी असलेले शेकडा प्रमाण येथे १० टक्के आहे.

शहरी व ग्रामिन भागातील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील मिळून एकुन पुरुष शिक्षक संख्या ४५६ इतकी आहे तर शहरी व ग्रामिन भागातील अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील मिळून एकुन महिला शिक्षक संख्या २४४ इतकी आहे.

यामध्ये शहापुर व मुरबाड हे ग्रामिन तालुके आहेत. ठाणे आणि उल्हासनगर हे शहरी तालुके आहेत.

## संशोधनाची साधने

संशोधनासाठी जो विषय निवडला त्या संबंधित विविध प्रकारची माहिती संकलीत करावी लागली. ती माहिती संकलीत करावयाची विविध साधने आहेत. संशोधनाचे अंतिम निष्कर्ष

काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक ठरते.हया माहितीलाच आधार सामग्री असे म्हणतात. आधर सामग्री संकलीत करण्यासाठी विविध प्रकारच्या साधनांचा वापर संशोधिकेने केला आहे.

संशोधिकेने आपल्या संशोधनाला अनुसरून पुढील साधनांची निवड केली आहे.

१ . पद्निश्चयन श्रेणी ; ( शिक्षक समस्या तपासणी)

२ . शिक्षकांचे व्यवसाय समाधान प्रमाणित चाचणी (डॉ.प्रमोद कुमार व डॉ. डी.एन. मुथा )

रंशोधिकेने माहिती वर्णनात्मक सांख्यिकीय स्वरूपात गोळा केलेली आहे.

माहिती विश्लेषणासाठी संख्याशास्त्रातील रेषीय प्रतिगमन विश्लेषण

(Linear Regression analysis) पद्धतीचा वापर करून IBM SPSS- 22 या सॉफ्टवेअर द्वारे मांडला आहे.

## तक्ता क्रमांक १

## माध्यमिक शिक्षकांना येणाऱ्या समस्या, व्यावसायिक समाधान आणि गुणवत्ता विकास यांचा बहूसंबंध गुणांक

| चले | R१(२३४५६) | $R^2$१(२३४५६) | शेरा |
|---|---|---|---|
| व्यावसायिक समाधान<br>वैयक्तिक समस्या<br>व्यावसायिक समस्या<br>शासकीय समस्या<br>भौतिक समस्या<br>शैक्षणिक समस्या | ०.८५ | ०.७२२५ | P<०.०१ |

## निरीक्षण

तक्ता क्र.१ या वरून असे दिसुन येते ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरुष शिक्षकांचे व्यावयायिक समाधान आणि गुणवत्ता विकास यांचा बहूसंबंध गुणांक ०.८५ आहे. आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासा विषयी भाकीत करताना पुरूष शिक्षकांचे व्यावसायिक समाधान व एकत्रितरीत्या येणाऱ्या समस्या यांच्या सहभागाची टक्केवारी ही ७२.२५ इतकी आहे.

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 5

अनुमान

तक्ता क्र.४.१ वरून सिद्ध होते की बहुसंबंध गुणांक ०.८५ आहे की जो t ०.०१ पेक्षा लक्षणियरित्या मोठा आहे. तर df = ६/४५५ इतका आहे.यावरून परिकल्पनेचा अस्विकार होतो.

## निष्कर्ष

ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान, विद्यार्थी गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना खुपच महत्वाच्या ठरतात.

२..ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा वैयक्तिकरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

तक्ता क्र.४.२

चलनिहाय व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास ,माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्या यांचे महत्व दर्शवणारा बीट-सहसंबंध,टी-मूल्य व टक्केवारीचा तक्ता

| चले | बीट-सहगुणांक | टी-मूल्य | शेरा | र | सहभाग टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक समाधान | ०.४९ | १६.७२ | P<०.०१ | -०.५५ | १३.९७ |
| वैयक्तिक समस्या | ०.५२ | ७.६९ | P<०.०१ | -०.२२ | ७.३५ |
| व्यावसायिक समस्या | ०.५६ | ९.६० | P<०.०१ | -०.४० | ८.२० |
| शासकीय समस्या | -०.४० | १०.५६ | P<०.०१ | -०.२१ | ९.७२ |
| भौतिक समस्या | ०.४६ | ९.९४ | P<०.०१ | -०.२२ | १५.२६ |
| शैक्षणिक समस्या | -०.८२ | ७.२८ | P<०.०१ | -०.५५ | १७.७५ |

निरीक्षण:

तक्ता क्र.४.२ वरून लक्षात येते की व्यावसायिक समाधानाचा बीट-सहगुणांक ०.४९ आणि माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्यां अर्थात वैयक्तिक समस्यांचा -०.५२,व्यावसायिक समस्या -०.५६,शासकीय समस्या -०.४०, भौतिक समस्या -०.४६ आणि शैक्षणिक समस्या -०.८२ आणि हया सर्वांचा बीट-सहगुणांक ०.01 पेक्षा अधिक आहे. तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्यांची अनुक्रमे टक्केवारी ही वैयक्तिक समस्यां ७.३५,व्यावसायिक समस्या ८.२०,शासकीय समस्या ९.७२, भौतिक समस्या १५.२६, शैक्षणिक समस्या १७.७५ इतकी आहे.

## अनुमान

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर वैयक्तिकरीत्या शिक्षकांचे व्यावसायिक समाधान टक्केवारी १३.९७ ,भौतिक समस्या टक्केवारी १५.२६ व शैक्षणिक समस्यांची टक्केवारी १७.७५ खूप जास्त आहे.तर वैयक्तिक समस्या ,व्यावसायिक समस्या,शासकीय समस्या यांची टक्केवारी अनुक्रमे ७.३५,८.२०,व ९.७२ इतकी म्हणजे विद्यार्थी गुणवत्ता विकासात या समस्यांचा कमी सहभाग आहे .

## निष्कर्ष

ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांचे व्यावसायिक समाधान,भौतिक समस्या ,शैक्षणिक समस्या या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर परिणाम करतात.

३..ठाणे जिल्हयातील माध्यमिक पुरूष शिक्षकांचे व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्या यावर आधारीत पुनर्गमन समीकरण स्थापित करणे.

## तक्ता क्र . ४.३

माध्यमिक पुरूष शिक्षकांचे व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्या यावर आधारीत पुनर्गमन समीकरण स्थापित करणे.

Y=७८.३७+(०.४९ x X१)-(०.५२ x X२)+(०.२४ x X३)+(०.५६ x X४)+(०.४६ x X५)-(०.८२x X६)

| | |
|---|---|
| Y= | विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास |
| X१= | व्यावसायिक समाधान |
| X२= | वैयक्तिक समस्या |
| X३= | व्यावसायिक समस्या |
| X४= | शासकीय समस्या |
| X५= | भौतिक समस्या |
| X६= | शैक्षणिक समस्या |

तक्ता क्र ४.३ वरून दिसुन येते की,माध्यमिक पुरूष शिक्षकांचे व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्या यावर आधारीत पुनर्गमन समीकरण हे पुढील सहा चलांवर आधारीत आहे. X१= व्यावसायिक समाधान , X२= वैयक्तिक समस्या, X३=व्यावसायिक समस्या , X४= शासकीय समस्या , X५= भौतिक समस्या X६= शैक्षणिक समस्या

४.ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा एकत्रितरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

तक्ता क्रमांक .४.४

माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या, व्यावसायिक समाधान आणि गुणवत्ता विकास यांचा बहूसंबंध गुणांक

| चले | R१(२३४५६) | $R^2$१(२३४५६) | शेरा |
|---|---|---|---|
| व्यावसायिक समाधान<br>वैयक्तिक समस्या<br>व्यावसायिक समस्या<br>शासकीय समस्या<br>भौतिक समस्या<br>शैक्षणिक समस्या | ०.८९ | ०.७९२१ | P<०.०१ |

निरीक्षण

तक्ता क्र.४.४ या वरून असे दिसुन येते ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यावयायिक समाधान आणि गुणवत्ता विकास यांचा बहूसंबंध गुणांक ०.८९ आहे. आणि

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासा विषयी भाकीत करताना महिला शिक्षकांचे व्यावसायिक समाधान व एकत्रितरीत्या येणाऱ्या समस्या यांच्या सहभागाची टक्केवारी ही ७९.२१ इतकी आहे.

## अनुमान

तक्ता क्र.४.१ वरून सिद्ध होते की बहुसंबंध गुणांक ०.८९ आहे की जो t ०.०१ पेक्षा लक्षणियरित्या मोठा आहे. तर df = ६/४५५ इतका आहे.यावरून परिकल्पनेचा अस्विकार होतो.

## निष्कर्ष

ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान, विद्यार्थी गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना खुपच महत्वाच्या ठरतात.

५..ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या त्यांचे व्यावसायिक समाधान यांचा वैयक्तिकरित्या विद्यार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे.

तक्ता क्र.४.५

चलनिहाय व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास ,माध्यमिक महिला शिक्षकांना येणाऱ्या समस्या यांचे महत्व दर्शवणारा बीट-सहसंबंध,टी-मूल्य व टक्केवारीचा तक्ता

| चले | बीट-सहगुणांक | टी-मूल्य | शेरा | र | सहभाग टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक समाधान | ०.३० | ३.८८ | P< ०.०१ | -०.१४ | १५.९० |
| वैयक्तिक समस्या | -०.१२ | ६.१९ | P<०.०१ | -०.४५ | ८.८८ |
| व्यावसायिक समस्या | ०.२४ | १२.०८ | P<०.०१ | -०.४१ | ९.३५ |
| शासकीय समस्या | -०.२३ | १५.१८ | P<०.०१ | -०.१० | ९.५४ |
| भौतिक समस्या | -०.९८ | ४.६१ | P<०.०१ | -०.५१ | १६.७० |
| शैक्षणिक समस्या | -०.७१ | १५.१८ | P<०.०१ | -०.४० | १८.८४ |

निरीक्षण:

तक्ता क्र.४.५ वरून लक्षात येते की व्यावसायिक समाधानाचा बीट-सहगुणांक ०.३० आणि माध्यमिक पुरूष शिक्षकांना येणाऱ्या समस्यां अर्थात वैयक्तिक समस्यांचा -०.१२,व्यावसायिक समस्या -०.२४,शासकीय समस्या -०.२३, भौतिक समस्या -०.९८, आणि शैक्षणिक समस्या -०.७१ आणि हया सर्वांचा बीट-सहगुणांक ०.०१ पेक्षा अधिक आहे. तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्यांची अनुक्रमे टक्केवारी ही वैयक्तिक समस्यां

८.८८,व्यावसायिक समस्या ९.३५,शासकीय समस्या ९.५४, भौतिक समस्या १६.७०, शैक्षणिक समस्या १८.८४ इतकी आहे.

## अनुमान

विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर वैयक्तिकरीत्या शिक्षकांचे व्यावसायिक समाधान टक्केवारी १५.९० ,भौतिक समस्या टक्केवारी १६.७० व शैक्षणिक समस्यांची टक्केवारी १८.८४ खूप जास्त आहे.तर वैयक्तिक समस्या ,व्यावसायिक समस्या,शासकीय समस्या यांची टक्केवारी अनुक्रमे ८.८८,९.३५,व ९.५४ इतकी म्हणजे विद्यार्थी गुणवत्ता विकासात या समस्यांचा कमी सहभाग आहे .

निष्कर्ष

ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यावसायिक समाधान,भौतिक समस्या ,शैक्षणिक समस्या या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर परिणाम करतात.

..ठाणे जिल्हयातील माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्या यावर आधारीत पुनर्गमन समीकरण स्थापित करणे. तक्ता क्र . ४.६

माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्या यावर आधारीत पुनर्गमन समीकरण स्थापित करणे.

| |
|---|
| Y=७२.५८+(०.३० x X१)-(०.१२ x X२)+(०.२४ x X३)+(०.२३ x X४)-(०.९८ x X५)-(०.७१ x X६) |

| | |
|---|---|
| Y= | विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास |
| X१= | व्यावसायिक समाधान |
| X२= | वैयक्तिक समस्या |
| X३= | व्यावसायिक समस्या |
| X४= | शासकीय समस्या |
| X५= | भौतिक समस्या |
| X६= | शैक्षणिक समस्या |

तक्ता क्र ४.३ वरून दिसुन येते की,माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यावसायिक समाधान आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाविषयी भाकीत करताना येणाऱ्या समस्या यावर आधारीत पुनर्गमन समीकरण हे पुढील सहा चलांवर आधारीत आहे.

X१= व्यावसायिक समाधान , X२= वैयक्तिक समस्या, X३=व्यावसायिक समस्या , X४= शासकीय समस्या , X५= भौतिक समस्या X६= शैक्षणिक समस्या.

## ४.२ निदर्शनास आलेल्या बाबी

संशोधिकेने गोळा केलेल्या माहीती वरील विश्लेषण आणि स्पष्टीकरणानंतर खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. माध्यमिक पुरूष शिक्षकांचे व्यवसाय समाधान व त्यांना भेडसावत असणाऱ्या समस्या एकत्रितरीत्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर महत्वाचा परिणाम साधतात.

२. माध्यमिक पुरूष शिक्षकांचे व्यावसाय समाधान,भौतिक समस्या व शैक्षणिक समस्या या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाचे अतिशय चांगले मापदंड आहेत.

३. माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यवसाय समाधान व त्यांना भेडसावत असणाऱ्या समस्या एकत्रितरीत्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर महत्वाचा परिणाम साधतात.

४. माध्यमिक महिला शिक्षकांचे व्यावसाय समाधान,भौतिक समस्या व शैक्षणिक समस्या या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाचे अतिशय चांगले मापदंड आहेत.

५.पुनर्गमन समीकरण ( माध्यमिक पुरूष शिक्षक )

विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास = ७८.३७ + (०.४९ x व्यावसायिक समाधान)-( ०.४६ x वैयक्तिक समस्या) + (१.५६ x व्यावसायिक समस्या) -( ०.३९९ x शासकीय समस्या) + (०.५२ x भौतिकसमस्या) - (०.८२ x शैक्षणिक समस्या)

५.पुनर्गमन समीकरण ( माध्यमिक महिला शिक्षक )

विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास = ७२.५८ + (०.३० x व्यावसायिक समाधान)-( ०.१२ x वैयक्तिक समस्या) + (०.२४ x व्यावसायिक समस्या) -( ०.२३ x शासकीय समस्या) + (०.९८ x भौतिकसमस्या) - (०.७१ x शैक्षणिक समस्या)

**संशोधनाचे महत्त्व :**

कोणत्याही माध्यमिक शाळांची गुणवत्ता व दर्जा चांगला असेल तर शिक्षक अध्यापनाचे कार्य समाधानाने करतात. त्यामुळे त्यांना व्यवसायिक समाधान लाभते. शिक्षकांना व्यवसायिक समाधान लाभण्यासाठी माध्यमिक शाळेतील भौतिक सोयी सुविधा, इमारत, संदर्भ ग्रंथ इत्यादी सुविधा असणे गरजेचे आहे. परंतु आधुनिक काळातील गरजेनुसार दृकश्राव्य साधणे, प्रोजेक्टर, डि. एल. पी. इत्यादी साधानाचा अध्यापनामध्ये वापर करण्यासाठी विदयालयात अशी साधने उपलब्ध असणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षकांना समाधानाने अध्यापन करता येते. ही साधने भौतिक सुविसुविधा उपलब्ध नसतील तर शिक्षकांना प्रभावीपणे अध्यापन करता येत नाही. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. त्यांचा परिणाम शिक्षकांच्या व्यवसाय समाधानावर व पर्यायानी विदयार्थ्याच्या गुणवत्तेवर होतो म्हणून माध्यमिक शाळेत सर्व सोयी सुविधा असणे गरजेचे आहे. विदयार्थ्याची गुणवत्ता अधिक वाढविण्यासाठी त्या-त्या विषयाचे आकलन होणे गरजेचे असते व शैक्षणिक सुविधाा असलेल्या शाळेतील विदयार्थ्याची शैक्षणिक गुणवत्ता ही आधिक असल्याची आढळून येते.

माध्यमिक शाळेमधील शिक्षकांना अनेक वैक्तिक समस्यांमध्ये शिक्षकांना शारीरिक, मानसिक, भावनिक समस्यांचा सामना करावा लागतो. अशा वेळी त्यांच्या समस्यांचे निराकरण न

झाल्यास ते व्यवसायिक असमाधानी राहतात. त्याचा परिणाम हा त्यांच्या शरीरावर, त्यांच्या कार्यक्षमतेवर होतो. पर्यायानी विदयार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावरील परिणाम झालेला आढळून येतो.

## शिफारशी

शासन

१ . माध्यमिक शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात यावी.

२. माध्यमिक शाळेतील शिक्षकांवर शासनाकडून दिला जाणारा अतिरिक्त कामाचा बोजा कमी करण्यात यावा.

३. माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी मेळावे आयोजीत करावेत शिक्षकांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळेल अशा गोष्टींची व्यवस्था करण्यात यावी.

४. शिक्षकांच्या वैयक्तिक समस्येसाठी शिक्षणाधिकाऱ्यांनी महिन्यातून किमान एक दिवस ठेवावा.त्यात शिक्षकांच्या समस्या जाणून समजून घ्याव्यात.

५. प्रत्येक माध्यमिक शाळेत भौतिक सुविधा देण्याचा प्रयत्न करावा.

६. पदोन्नती,वरीष्ठ वेतन श्रेणी,बदली बाबत येणाऱ्या समस्यांसाठी शासनांनी ठोस नियम तयार करावेत.

७. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मतांचा बदलत्या शैक्षणिक धोरणे,नियम,अभ्यासक्रम,मूल्यमापन यासारख्या बाबतीत समावेश करावा.

८. माध्यमिक शाळेतील बदलत्या अभ्यासक्रमानुसार वेळोवेळी शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या सोयी कराव्यात.हे प्रशिक्षण योग्य कालावधीत तसेच अनुभवी तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात यावे.

९. प्रत्येक माध्यमिक शाळेत सुसज्ज ग्रंथालय असावे यासाठी शाळांना सुविधा व अनुदान पूरवण्यात यावे.

१०. शासनाच्या उपक्रमांचा अमंलबजावनी ही शाळा स्तरावर करावी लागत असते त्यामूळे उपक्रमांच्या अमंलबजावनी संदर्भात स्पष्ट व सोप्या भाषेत दिशानिर्देश होणे गरजेचे असते.

११. उपक्रमांची अमंलबजावनी फक्त कागदोपत्री न होता त्या उपक्रमांचे फलित निश्चित करून त्यासंबंधी प्रत्यक्ष वस्तुस्थिती जाणून घेण्यात यावी.

१२. शासनाने योजना किंवा उपक्रम राबवित असताना सनियंत्रन अधिकारी यांची नेमणूक करावी व त्यांच्या मार्फत वस्तुनिष्ठ मूल्यमापन करावे.

## मुख्याध्यापक

१. शाळेत शिक्षकांचे योग्य व नियमांनुसार वेळापत्रक तयार करावे.
२. वेळोवेळी शिक्षकांचे पाठ निरीक्षण करावे.
३. शाळेत उपक्रम राबविण्यासंबंधी शिक्षकांना मार्गदर्शन करावे.
४. शिक्षकांना वेळोवेळी आवर्जुन प्रशिक्षणास पाठविने
५. न्वनवीन साहित्याचा व माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्यासाठी शिक्कांना प्रोत्साहित करावे.
६. लोकसभातील उपक्रमांना प्राधान्य देवुन सकारात्मक दृष्टिकोन शिक्षकांमध्ये निर्मान करावा.
७. शिक्षकांना येणाऱ्या समस्या तसेच विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेणे व त्या सोडविण्यासाठी कृतिसंशोधन करण्यास प्रवृत्त करणे.
८. शिक्षकांसाठी तज्ज्ञ मार्गदर्शने व शिबीरांचे आयोजन करणे.
९. शिक्षकांचे कलागुण हेरून त्यांच्या कलेचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी करून घेण्यास प्रोत्साहित करणे.

१०.इ-लर्निंग व डिजिटल शाळा यांना भेटी देऊन त्या प्रकारचे उपक्रम शालेय स्तरावर करण्यासाठी शिक्षकांना प्रवृत्त करणे.

११.समाज सहभाग व लोकसहभाग मिळवून शालेय भौतिक सुविधा उत्कृष्ट दर्जेदार करून घेणे.

१२. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिन विकासाठी शालेत वेळोवेळी सहशालेय उपक्रमांचे आयोजन करणे. चित्रकला प्रदर्शन,विज्ञान प्रदर्शन,क्रिडास्पर्धा तसेच काव्यसमेंलन,समाजातील तज्ज्ञ व्यक्तींचे तसेच विविध क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींची व्याख्याने आयोजीत करावीत.

१३. शिक्षकांना येणाऱ्या समस्या सहानुभूतीपूर्वक समजून घ्याव्या व योग्य ती कारवाही करावी.

१४. शिक्षकांच्या बाबतीत पूर्वग्रह दुषित दृष्टिकोन ठेवून वागू नये.

१५.शाळेतील शिक्षकांमध्ये गटबाजी होण्यापासून रोखावे.

१६. शाळेतील विशेषगरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या मुलभूत क्षमता प्राप्त करून देण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहीत करावे.

१७. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी शिक्षकांना कृतिशील करावे.

**शिक्षक**

१. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील कला-गुणांचा शोध घवून त्यांना विकसीत करण्यासाठी उपक्रमांचे आयोजन करावे.
२. शालेय/सहशालेय उपक्रमात सहभागी होऊन उपक्रमांची आवश्यकता व प्रभावीपणा निर्मान करावा.
३. इ-लर्निंग व डिजिटल शाळांना भेटी देऊन आपल्या शाळेत तसे वातावरण तयार करावे.
४. नवनविन माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत भर घालावी.
५. अध्ययन-अध्यापनात विविध अडचणी निर्माण होतात.त्या सोडवण्यासाठी वरीष्ठांचे मार्गदर्शन घ्यावे.
६. आपल्या अध्यापन विषय अधिक सखोल होण्यासाठी इतर माध्यमांचा उदा:संदर्भ ग्रंथ,पुस्तके,वर्तमानपत्र,वस्तु,व्यक्ती यांच्याशी संपर्क राखायला हवा.
७. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी कृतिशील उपक्रम/नाविन्यपुर्ण उपक्रम देवून विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.
८. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते संदर्भात किंवा काही तक्रारी असल्यास त्या संदर्भात मुख्याध्यापक,पालक वतज्ञांशी चर्चा करावी.
९. वर्गातील विशेष गरजा असणारे विद्यार्थी असल्यास त्यांच्या शिक्षणांसाठी शासनाकडून मिळणाऱ्या सोयी व सुविधा मिळव्यात म्हणून आवश्यक बाबींच्या पुर्ततेसाठी सहकार्य करावे.
१०. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना किमान मुलभूत क्षमता प्राप्त करून देण्यासाठी सहकार्य करावे.
११. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय सूचविण्यासाठी कृतिसंशोधन करावे.

१२. शिक्षकांनी शासनांच्या योजनांची अमंलबजावणी काळजीपूर्वक व योग्य पद्धतीने करावी.

१३. नविन आलेल्या अध्यापन पद्धती किंवा मूल्यमापन प्रक्रिया यात सकारात्मक दृष्टिकोन ठेवून कार्य करावे.

१४. शिक्षकांनी आपल्या वैयक्तिक समस्येसाठी मुख्याध्यापकांशी चर्चा करावी.

१५. शिक्षकांनी आपली मते स्पष्ट व थोडक्यात मांडावी.

१६. शासनाने आयोजीत केलेल्या किंवा खाजगी प्रशिक्षणनां हजर राहून त्याचा उपयोग शाळा व विद्यार्थ्यांसाठी करावा.

१७. थ्शक्षकांनी शाळेतील असुविधाबाबत सतत वाच्यता न करता त्या कशा पूऱ्या करता येतील यासाठी प्रयत्न करावे.

१८. अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करावा तसेच शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावे.

## पुढील संशोधनासाठी सुचना

१. माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसायिक समाधानाच्या विदयार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

२. माध्यमिक शाळेतील शिक्षकांना येणाऱ्या समस्याचा विदयार्थी गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

३. अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या समस्याचा त्यांच्या व्यवसायिक समाधानावर होणारा परिणाम अभ्यासणे.

४. अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे व्यवसाय समाधान व विदयार्थी विकास गुणवत्ता विकास यांचा संबधाचा अभ्यास.

५. विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील येणाऱ्या समस्याचा व्यवसायिक समाधानावर होणारा परिणाम अभ्यासणे.

६.विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे यवसायिक समाधान व विदयार्थी गुणवत्ता विकास यांच्याशी असलेल्या सहसंबंधाचा अभ्यास.

७.अशाच प्रकारचे संशोधन कार्य वेगवेगळया वयोगटातील विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी करता येईल.

८.अशाच प्रकारचे संशोधन कार्य वेगवेगळया मानसिक चलांसाठी करता येईल

९.अधिक निश्चित परिणाम जाणून घेण्यासाठी नमुना आकार मोठा घेता येईल.

१०. शैक्षणिक धोरण निर्धारकांना ,अभ्यासक्रम तयार करणाऱ्या व्यक्तींना आणि शेक्षणिक संशोधकांना पुढील अभ्यासासाठी हे संशोधन कार्य प्रेरणिय ठरू शकेल.

११. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासाचे भाकित करण्यासाठी ज्या साधनांचा विशेष समीकरण स्थापित करण्यासाठी वापर केला आहे त्याच साधनांचा व्यावसायिक समाधान व माध्यमिक शिक्षकांना येणाऱ्या समस्या यांचा अभ्यास करताना वापर केला जाईल याची संशोधकाने काळजी घ्यावी.

## संदर्भ ग्रंथसूची

१) पाटील वा. बा. - ( १९९८) - संशोधन पद्धती,श्री. मंगेश प्रकाशन नागपूर

२) पंडित बन्सी बिहारी.- (२००७)-शिक्षणातील संशोधन संख्यात्मक आणि गुणात्मक,, नित्यनुतन प्रकाशन,पुणे-३०

३) भिंताडे वि. रा. - (२००९) शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्यनुतन प्रकाशन,पुणे-३०

४)पाटील वा.बा.-( २००५ ),शैक्षणिक संशोधन,महाराष्ट्र विद्यापीठ,नागपूर

५) बांदोडकर सुधिर-(२००७),सामाजिक संशोधन पद्धती, नित्यनुतन प्रकाशन,पुणे-३०

६) आगलावे प्रदिप - (२०००),संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्याप्रकाशन नागपूर.